महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्रमांक: एफएसटी-०९/१९/प्र.क्र.२५६/फ-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९.

पहा :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष १०(१)/आस्था/एक/प्र.क्र. १२(१९-२०)/२५४, दि. १८.९.२०१९

शासन आदेश :

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने वन विभागातील वनक्षेत्रपाल, गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्याची त्यांच्या विनंतीनुसार रिक्त पदी बदलीने खालीलप्रमाणे पदस्थापना करण्यात येत आहे:-

अ.क्र	अधिकाऱ्यांचे नाव व सध्याची पदस्थापना	बदलीनंतरची पदस्थापना	शेरा
१	श्री. श्रीधर गोविंदराव कवळे, वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) माहूर, नांदेड वनविभाग (औरंगाबाद वनवृत्त)	वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), नांदेड, नांदेड वनविभाग (औरंगाबाद वनवृत्त)	विनंतीनुसार रिक्त पदावर

२. महसूल व वनविभाग शुध्दीपत्रक क्र. एमएफएस-२०१६/प्र.क्र.१४३/फ-८, दिनांक २२/५/२०१७ व शुध्दीपत्रक दिनांक ४/४/२०१८ मधील तरतूदीनुसार वन परिक्षेत्र अधिकारी संवर्गातील अधिका-याने प्रादेशिक पदावर ३ वर्षाची सेवा केल्यानंतर त्याची पुढील पदस्थापना वन्यजीव किंवा सामाजिक वनीकरण शाखेत करावयाची आहे. तद्नुसार, श्री. श्रीधर गोविंदराव कवळे, वन परिक्षेत्र अधिकारी हे उपरोक्त तरतुदीच्या अधीन राहून उर्वरीत कालावधीसाठी (१ वर्ष ४ महिने) वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) नांदेड, नांदेड वनविभाग या पदावर कार्यरत राहतील. श्री. कवळे, वनपरिक्षेत्र अधिकारी यांना दि.१८.०१.२०२१ रोजी सदर पदावरुन कार्यमुक्त करुन पुढील पदस्थापना वन्यजीव किंवा सामाजिक वनीकरण शाखेत देण्यात येईल.

३. उपरोक्त अधिकाऱ्याच्या रिक्त झालेल्या पदावर नियंत्रक अधिकाऱ्यांनी रिक्त पदाचा कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्याची कार्यवाही करावी.

४. सदर पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधित अधिकाऱ्यास नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

५. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

६. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१८१८४६४५७७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Babasaheb S. Shinde

Digitally signed by Babasaheb S. Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1706e7b903eb05a5f1c405f3795499452af658b876e10b223a0cef893b6b6689, cn=Babasaheb S. Shinde
Date: 2019.09.18 20:02:54 +05'30'

(बा.सि.शिंदे)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद.
४. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
५. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
६. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
७. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.
८. श्री. श्रीधर गोविंदराव कवळे, वन परिक्षेत्र अधिकारी यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यमसंवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे मार्फत.
९. निवड नस्ती (फ-४ कार्यासन).